# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०१/२०२५ (मंगळवार) सायंकाळ**

---

### प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे खापरखेडा:— दिनांक १४/०१/२०२५ रोजी पोस्टे खापरखेडा स्टाफ पो. स्टे. परीसरात नाँयलन मांजा कार्यवाही करीता तसेच पेट्रोलींग कामी खाजगी वाहनाने फिरत असता खास मुखबीरादारांमार्फत माहीती मिळाली की, आदित्य विनोद शेन्डे रा. बिना संगम याने स्वता जवळ शासनाची बंदी असलेला नाँयलॉन मांजा बाळगुन ठेवला आहे. यावरुन आम्ही मौजा बिना संगम येथे जावुन रेड कार्यवाहीत **आरोपी आदित्य विनोद शेंडे वय २२ वर्षे रा. बिना संगम वार्ड नं. ०३ ता. कामठी जि. नागपुर** यास बंदी असलेल्या नॉयलॉन मांजा बाबत विचारपुस केली असता नागपुर येथुन एका दुकानातुन पतंग उडविन्याकरीता प्रत्येकी ५००/— रु प्रमाणे ३ चक्री नाँयलॉन मांजा विकत घेतला आहे. आणी स्वताचे घरी लपवुन ठेवले आहे. असे सांगीतले यावरुन आदित्य शेन्डे याचे ताब्यातुन ३ चक्री नॉयलॉन मांजा प्रत्येकी अंदाजे कि. ५००/— रु प्रमाणे असा एकुण १५००/— रु चा मुद्देमाल जप्त केला.आरोपीविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनीयम कलम ५, १५ अन्वये गुन्हा केला आहे.

### प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन नरखेड :— येथे दिनांक १४/०१//२०२५ रोजी नरखेड पोलीस पो. स्टे. परीसरात नाँयलन मांजा कार्यवाही करीता तसेच पेट्रोलींग करीत असताना मुखबीरादारामार्फत माहीती मिळाली की, **शेख शकील शेख करीम रा. वार्ड क्र १४ नरखेड** हा गांधी चौक नरखेड येथे फ्रुट च्या दुकानात शासनाची बंदी असलेला नाँयलॉन मांजा बाळगुन ठेवला आहे. यावरुन पोलीसांनी त्याचे दुकानात रेड केली असता त्याचे दुकानात . ४ नग नॉयलॉन मांजा प्रत्येकी अंदाजे कि. ५००/— रु प्रमाणे असा एकुण २०००/— रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुददेमाला जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे नरखेड येथे कलम १२५,२२३ भारतीय न्याय संहीता सहकलम ५, १५ पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन काटोल :— येथे दिनांक १४/०१//२०२५ रोजी काटोल पोलीस पो. स्टे. परीसरात नॉयलन मांजा कार्यवाही करीता तसेच पेट्रोलींग करीत असताना मुखबीरादारामार्फत माहीती मिळाली की, **शर्फदिन सलाउददीन सय्यद रा बस स्टॉप जवळ काटोल हा त्याचे ढोके कॉम्पेक्स जवळील दुकानात** शासनाची बंदी असलेला नॉयलॉन मांजा बाळगुन ठेवला आहे. यावरुन पोलीसांनी त्याचे दुकानात रेड केली असता त्याचे दुकानात हिरव्या रंगाचा नॉयलॉन मांजा प्रत्येकी अंदाजे कि. ९००/— रु असा एकुण ९००/— रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुददेमाला जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे काटोल कलम १२५,२२३ भारतीय न्याय संहीता सहकलम ५, १५ पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर